भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ८९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/०२/२०१८

**१) मनेरी दुकानातील साहीत्यांची चोरी:—**

दिंनाक १४/२/२०१८ चे २०.०० ते दि. १५/०२/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी श्रीधर रावजी बोरकर वय ४२ वर्ष रा. पेंढरी याने त्याचे किराणा मनेरीचे दुकाण दि. १४/२/२०१८ ला २०.०० वाजता बंद केले व दि. १५/०२/२०१८ ला सकाळी ०७.०० वाजता उघडले तेव्हा त्यास दुकाणा मध्ये छताचे कवेलु व फाटे उघडे दिसल्याने, कोणीतरी अज्ञात चोराने दुकाणात प्रवेश करून बाजारू कानातील व नाकातील बिरे डुल १००० डझन, पायल २० नग, बाजारू अंगठी २० डझन नेकलेश १२ नग, नेलपेंट २ डझन, गळयातील चैन, हातातील स्टिलचे कडे ४० नग, कंगवे ६ नग, पॅराशुट, डाबर शांती आवला तेल १२ बॉडल, चिवडा नमकीन १ किलो लॉयबाय पत्ती २५ पुडे, डॉट पेन २० नग, पारले बिस्कीट पुडे २० नग, सिसपेन्सील १ नग, असा एकुण २६,२४०/रु. चा माल चोरून नेल्याने, फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**२) रोपवनाची माहीती दर्शवीणारा लोखंडी बोर्डची चोरी:—**

दिंनाक १४/२/२०१८ चे १९.३० ते दि. १५/०२/२०१८ चे ०५.४५ वाजता दरम्यान यातील वनविभागा तर्फे तयार करण्यात आलेले मिश्र रोपवनाची माहीती दर्शविणारा माहीती दर्शक लोंखडी बोर्ड कि. २,३००/रु. चा कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने, फिर्यादी निलेश सुरेश कंळबे वय २३ वर्ष रा. सोंडया यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील सफौ. उईके पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**३) उपचारा दरम्यान म्हैशीचा मृत्यु:—**

दिंनाक १४/२/२०१८ चे ०१.०० वाजता दरम्यान यातील आरोपी व फिर्यादी यांचे घर एकमेकांचे शेजारी असुन आरोपीचे म्हैशीने फिर्यादीचे मशीला मारल्याने, फिर्यादीची म्हैश उपचारा दरम्यान मरण पावली, यातील आरोपी यांनी आपली म्हैश बाधण्यास हयगय केली व संभाव्य धोक्यापासुन सुरक्षीत राहण्या ईतका बदोबंस्त केले नसल्याने, आरोपीचे म्हैशीने, फिर्यादीचे म्हैशीला गंभिर जखमी केल्याने, म्हैश मरण पावल्याने, फिर्यादी यादवराव झिंगर ठवकर वय २५ वर्ष रा. खैरी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २८९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील सफौ. केवट पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**४) ट्रॅक्टरच्या लोखंडी पट्टया वर पडुन मुलीचा उपचारा दरम्यान मृत्यु. :—**

दिनांक १५/०१/२०१८ चे १५.३० वाजता. यातील मृतक कु. पायल तारांचद मेश्राम वय ०८ वर्ष रा. खमारी पो.स्टे. कारधा ही दि. १५/०१/२०१८ चे १५.३० वाजता दरम्यान घरा शेजारी राहणारा मंच्छिद्र इंद्रजित मडामे वय ३३ वर्ष रा. खमारी यांचे ट्रॅक्टर क्र. एमएच ३६—६९६४ चे मागील नांगराचे लोखंडी पंटयावर बसुन शेतातुन घरी येतांना रामचंद्र समरीत यांचे शेताजवळ ट्रॅक्टरचे पट्टयावरून पडल्याने पोटाला लोखंडी पट्टा लागला, त्यानी प्रथमोपचार कामी सरकारी दवाखाना येथे उपचार करून रेफर केल्याने ट्रॅक्टर चालकाने व वडीलांनी नागपुर मेडीकल हॉस्पीटल येथे अपघात विभाग येथे आनुण टिकीट क्र. १७०४६४४ वर दि. १५/०१/२०१८ चे २१.१० वाजता भरती केले उपचार दरम्यान डॉ. खाडे यांनी तपासुन दि. १५/०१/१८ चे २०.३० वा. मृत घोषीत केल्याने, पो.स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. राठोड यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**५) जळल्याने उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु :—**

दिनांक १५/२/२०१८ चे ०६.३० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. ज्योती जयपाल कोसरे वय २६ वर्ष रा. वाकेश्वर ही ९० टक्के जळाल्याने तिला औषधोपचारा करीता दि. १५/०२/२०१८ ला सा. रू. भंडारा भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र सरतर्फे फिर्यादी पोहवा. साठवणे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. डोंगरे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**६) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु:–**

दिनाक २६/१/२०१८ चे ११.३० वाजता दरम्यान यातील मृतक राहुल श्रावण भातु बाबल वय ६० वर्ष रा. देवनारा कडे जात असतांना लुना गाडी हि स्लिप झाल्याने, तो खाली पडुन डोक्याला मार लागल्याने, त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता, उपचारा दरम्यान मृतक हा दि. २६/०१/२०१८ ला १८.१० वाजता मरण पावल्याने, पो.स्टे. अजनी येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. पवार यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लिल्हारे पोलीस स्टेशन. गोबरवाही हे करीत आहेत.

**७) उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु:–**

दिंनाक १९/१/२०१८ चे १६.०० वाजता ते २४/०१/२०१८ चे ०९.५० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. रवीकांता गजानन हातझाडे वय ५५ वर्ष रा. चांदोरी ही दि. १९/०१/२०१८ चे ०४.०० वाजता दर. आपले अंगणात ऊभी असतांनी तीला चक्कर येवुन खाली पडल्याने तीचे डोक्याला मार लागल्याने, तीला औषधोपचारा करीता डॉ. राजेश दवाखाना साकोली येथे प्रथम उपचार करून पुढील उपचारा करीता कॉलेज नागपुर येथे भरती केले असता, उपचारा दरम्यान मरण पावल्याने, पो.स्टे. अजनी येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. लेंडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोंडगे पोलीस स्टेशन. साकोली हे करीत आहेत.

**८) किटक नाशक औषध प्राशन करून औषधोपचारा दरम्यान तरूणाचा मृत्यु:–**

दिंनाक २२/१/२०१८ चे २०.०० वाजता ते २३/०१/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील मृतक तुकाराम सुभाष बालपांडे वय २८ वर्ष रा. सातोना याने स्वताचे घरी दारूचे नशेत किटक नाशक औषधी प्राशन केल्याने, त्याची प्रकृती बिघडल्याने, त्यास औषधोपचारा करीता सा. रू. भंडारा व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता, उपचारा दरम्यान दि. २६/०२/२०१८ चे १८.०० ला मरण पावल्याने, डॉ. मेमो वरून पो.स्टे. अजनी येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी पोउपनी. कारंडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास नापोशी. श्रीरामे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**९) अवैध दारु /जुगार अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक १५/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, करडी कारधा, तुमसर सिहोरा,गोबरवाही, साकोली लाखणी, व दिघोरी येथे अवैध दारू /जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण १४ गुन्हा दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ७० लिटर हातभट्टी दारू+ ८० किलो सडवा मोहा कि. ८,०००/रु. व ३ लिटर ६० मिलीलीटर देशी दारू किमती ९३६/रु. तसेच जुगारातुन १८,७८/रु. असा एकुन १०,८१४/रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १५/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ५२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२ तीन सिटर वाहनाकरीता ०१ ईतर वाहनांवरती – ४९ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनी. प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.